# वसई विरार शहर महानगरपालिका

वैद्यकीय आरोग्य विभाग

महानगरपालिका बहुउद्देशिय इमारत, प्रभाग समिती "सी" कार्यालय,

चौथा मजला, विरार (पूर्व) ता. वसई, जि. पालघर – ४०१ ३०५

Email Id-mohvvcmc@gmail.com


**जावक क्र.वविशम/वैआवि /२८११/२०२४** **दि.०६/०३/२०२४**

## // जाहिरात शुध्दीपत्रक //

**राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियान (NUHM) अंतर्गत ठोक मानधनावरील स्टाफ नर्स (GNM) संवर्गातील रिक्त पदे कंत्राटी पध्दतीने भरणेबाबत.**

वसई विरार शहर महानगरपालिका राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियान (NUHM) अंतर्गत करार तत्वावर ठोक मानधनावर तात्पुरत्या स्वरुपात कंत्राटी पध्दतीने ११ महिने २९ दिवस कालावधीसाठी रिक्त पदे भरण्यासाठी इच्छुक व पात्र उमेदवारांची निवड करणेकामी स्टाफ नर्स (GNM) या संवर्गातील पदांच्या थेट मुलाखत न घेता गुणांकन (Merit) पध्दतीने पदभरतीची बाबतची जाहिरात जावक क्र.वविशम/वैआवि/२६६१/२०२४ दि.२०/०२/२०२४ अन्वये महानगरपालिका संकेतस्थळावर तसेच जाहीर सूचना दि.२१/०२/२०२४ रोजीच्या दै. महाराष्ट्र टाइम्स, दै. महासागर, दै. परशुराम समाचार या वृत्तपत्रात प्रसिध्द करण्यात आली होती.

**सदर जाहिरातीमध्ये स्टाफ नर्स (GNM) या पदासाठी शैक्षणिक अर्हतेबाबत उच्च माध्यमिक (HSC) मंडळाची १२ विज्ञान शाखेतील परीक्षा उत्तीर्ण ही अट ठेवण्यात आली होती. तरी सदर अट रद्द करण्यात आली आहे. तरी स्टाफ नर्स (GNM) या पदासाठी शैक्षणिक अर्हता GNM/Bsc Nursing असे वाचण्यात यावे.** आता सदर पदभरती मुदत दि.०७/०३/२०२४ ते दि.१३/०३/२०२४ (सुट्टीचे दिवस वगळून) पर्यंत वाढविण्यात येत आहे.

तरी संबंधित पदासाठी आवश्यक शैक्षणिक अर्हता व पात्रता धारण करणाऱ्या उमेदवारांनी विहित नमुन्यातील अर्ज व आवश्यक त्या गुणपत्रके व प्रमाणपत्राच्या मूळप्रती व स्वक्षांकित सत्यप्रतींसह दि.०७/०३/२०२४ ते दि.१३/०३/२०२४ रोजीपर्यंत (सुट्टीचे दिवस वगळून) सकाळी ११.०० ते दुपारी ३.०० वाजेपर्यंत वैद्यकीय आरोग्य विभाग, महानगरपालिका बहुउद्देशिय इमारत, प्रभाग समिती "सी" कार्यालय, चौथा मजला, विरार (पू) येथे प्रत्यक्षात (By Hand) किंवा टपालाने/कुरीयरने सादर करण्यात यावेत. दिलेल्या मुदतीनंतर प्राप्त होणाऱ्या अर्जाचा विचार केला जाणार नाही. (टपालाने/कुरीयरने सादर करण्यात आलेले अर्ज विहीत कालावधीत या कार्यालयात पोहोचतील याची दक्षता घ्यावी. उशीरा प्राप्त अर्जाची दखल घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.)

तसेच जाहिरात जावक क्र.वविशम/वैआवि/२६६१/२०२४ दि.२०/०२/२०२४ अन्वये यापूर्वी सदर पदासाठी अर्ज केलेल्या उमेदवारांनी पुनश्च: नव्याने अर्ज सादर करण्याची आवश्यकता नाही ह्याची नोंद घ्यावी.

**सही/-**

(डॉ. भक्ती चौधरी)

प्र. वैद्यकीय आरोग्य अधिकारी तथा सदस्य सचिव

राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियान

वसई विरार शहर महानगरपालिका